॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १४ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात हर घर तिरंगा अभियान-२०२५ राबविण्यात येत आहे. हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता : स्वतंत्रता का उत्सव स्वच्छता के संग अभियानांतर्गत आज विद्यापीठाचे प्र - कुलगुरू प्रा. एस टी इंगळे यांच्या हस्ते विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीवर तिरंगा लावण्यात आला. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सचिन नांद्रे, वित्त विभागाचे महेंद्र पाटील, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**बातमी नं. २**

जळगाव दि. १४ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील योगशास्त्र विभागाच्या प्रा. गीतांजली भंगाळे यांनी नुकतीच पीएच. डी. पदवी प्राप्त केली असून विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

प्रा. गीतांजली भंगाळे यांनी 'विभिन्न योग ग्रंथो में वर्णित मन, मनोविकार और मनश्चिकित्सा का एक सैद्धांतिक अध्ययन' या विषयावर निर्वाण विश्वविद्यालय जयपूर येथून योग विषयात पीएच. डी. ही पदवी डॉ. नितीन कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ४ जुलै २०२५ रोजी प्राप्त केली. योगशास्त्र विभाग प्रमुख इंजि. राजेश पाटील, डॉ. लीना चौधरी (सहा प्रा. योग थेरेपी), प्रा. लिंता चौधरी यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले.विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. एस. टी. इंगळे आणि कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले.

.............................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १४ ऑगस्ट, २०२५

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता